Vol 5 Issue 7 Jan 2016 ISSN No :2231-5063

# International Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**Welcome to GRT**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

**Regional Editor**

Manichander Thammishetty
Ph.d Research Scholar, Faculty of Education IASE, Osmania University, Hyderabad

***International Advisory Board***

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

***Editorial Board***

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.org**

Golden Research Thoughts
International Recognition Multidisciplinary Research Journal

ISSN: 2231-5063 Impact Factor : 3.4052(UIF) Volume - 5 | Issue - 7 | Jan - 2016





शकील शेख




# सामाजिक परिवर्तनाचा विडा उचलणारा अवलिया 'कासिदकार'

शकील शेख
सह. प्राध्यापक, मराठी विभाग प्रमुख, सौ. सुवर्णलता गांधी महाविद्यालय, वैराग,
ता. बार्शी, जि. सोलापूर.

**सारांश –**

'चरित्र' हा तसा प्राचीन वाङ्मय प्रकार. शके १२०० (इ.स. १२७८) च्या सुमारास म्हाइंटभटाने लिहिलेला 'लीळाचरित्र' हा ग्रंथ मराठी भाषेतील आद्य चरित्रग्रंथ होय. नंतरच्या काळात मराठी भाषेत संत, महंत, राष्ट्रपुरुष, समाजसुधारक, नेते, अभिनेते अशा समाजातील विविध मान्यवर व्यक्तिची चरित्रे लिहिली गेली. चरित्र लेखनासाठी असामान्य व्यक्तीची नायक म्हणून लेखकाने निवड केलेली असते. त्या चरित्र नायकाच्या कार्यकतृत्वाची ओळख करुन द्यावी, त्यातून समाजाला मार्गदर्शन लाभावे. त्या चरित्र नायकाचे विचार समाजातील तळागाळातल्या लोकापर्यंत पोहचवावे आणि त्याने केलेल्या कार्याचा गौरव करावा अशा काहीशा हेतूने लेखक चरित्र लेखन करीत असतो.

**प्रस्तावना –**

सोलापूर सारख्या गिरणगावात आपल्या कार्यकर्तृत्वाच्या माध्यमातून सामान्यातून असामान्य पदापर्यंत जाऊन पोहचलेल्या अ. लतीफ नल्लामंदू यांचे 'कासिदकार' ह्याा चरित्र ग्रंथाचे लेखन प्रा. डॉ. इ. जा. तांबोळी यांनी केले आहे. मुस्लीम समाजालाच नव्हे तर संपूर्ण मानव जातीला मार्गदर्शक ठरणाऱ्याा या चरित्रग्रंथाचे प्रकाशन अक्षरलेणं प्रकाशन सोलापूर यांनी केले असून, हे एक श्रेष्ठ दर्जाचे चरित्रग्रंथ आहे.

डॉ. इ. जा. तांबोळी यांनी 'कासिदकार' चरित्र ग्रंथाचे लेखन दहा प्रकरणामध्ये केले असून या दहा प्रकरणामध्ये त्यांनी अ. लतीफ नल्लामंदू यांच्या व्यक्तिमत्वाचे विविध पैलू उलघडून दाखवले आहेत.

नल्लामंदू हे कुटुंब मूळ नारायण पेठ, दामरगिद्दा, जि. महेबुबनगर (जुना आंध्रा) येथील असून या खानदानाचे मूळ पुरुष हज्जूभाई सोलापूरला आले व येथे स्थायिक झाले. येथे त्यांनी हातमाग व्यवसायामध्ये जम बसविला. हज्जूभाईना इमामसाहेब, हुसेनसाहेब आणि दादाभाई अशी तीन मुले होती. त्यापैकी इमामसाहेब हे अ. लतीफ नल्लामंदू यांचे वडील होत.

अ. लतीफ नल्लामंदू यांचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांना शिक्षकाची नोकरी मिळाली. लग्न झाले, मुलं झाली, चांगला संसार सुरु होता पण सर स्वतःपूर्ता विचार करणाऱ्याापैकी नव्हते. आजुबाजूच्या समाजाकडे जेव्हा सर पाहत तेव्हा त्यांना समाजातील दुःख, दैन्य, दारिद्र्या दिसे. अशा स्थितीत समाजासाठी काही तरी करण्याचा विचार त्यांच्या मनात निर्माण झाला आणि या विचारातूनच त्यांनी समाज प्रबोधनासाठी सुरुवातीला १९७३ साली 'नजात' आणि काही कारणाने 'नजात' बंद पडताच १९७४ साली 'कासिद' हे साप्ताहिक सुरु केले. 'कासिद' म्हणजे संदेश देणारा अस्ताव्यस्त मुस्लीम समाजाला स्थिरता आणण्यासाठी, दारिद्र्या दूर

करण्यासाठी, रोजी-रोटीसाठी भटकंती करणाऱ्या समाजाच्या रोजी-रोटीचा प्रश्न सोडविण्यासाठी, झोपडपट्टीतील गतीहिन समाजाला गती प्राप्त करुन देण्यासाठी, एक वैचारिक भूमिका मांडण्यासाठी, समाजाचे प्रबोधन करण्यासाठी, नव्या जाणिवा प्राप्त करुन देण्यासाठी, वैचारिक जागृती निर्माण करुन समाजाची प्रगती साधण्यासाठी नल्लामंदू सरांनी 'कासिद' च्या माध्यमातून लेखणी उचलली आणि 'कासिद' मधून अल्लाचा संदेश लोकापर्यंत पोहचवला. 'कासिद' ला मुस्लीम समाजातले पहिले साप्ताहिक म्हणून मान मिळाला. १९७४ पासून आजपर्यंत 'कासिद' अखंड प्रकाशित होत आहे. याचे सर्व श्रेय अ. लतीफ नल्लामंदू यांनांच आहे. अ. लतीफ नल्लामंदू यांनी 'कासिद' मधून मानवी वृत्ती-प्रवृत्तीवर प्रकाश टाकताना माणसाने माणसाशी कसे वागावे ? खरी माफी कोणती ? माफी केल्याने काय होते ? नमाज पठणाचे फायदे काय आहेत ? ज्ञानाचे फायदे काय आहेत ? कोणत्या गुणांची जोपासना केल्यानंतर माणसाचे जीवन सुंदर बनते ? माणसाची इज्जत कशाने वाढते ? अशा विविध गोष्टींवर कुराणमधून आलेला संदेश साध्या व सोप्या भाषेत मांडला आहे.

अ. लतीफ नल्लामंदू यांनी कासिदमधून कुराणच्या आधारे तत्त्वज्ञानाची पेरणी केलेली दिसते. ते म्हणतात, 'माणसाला चार गोष्टी बलवान बनवितात, १) ज्ञान, २) वागणूक, ३) नेक गुणांची जोपासना, ४) उपकार (पान नंबर ४०) एखाद्या व्यक्तीशी दुश्मनी जरी असली तरी त्याच्याशी प्रेमाने वागावे'. हा नल्लामंदू सरांचा विचार उदात्ततेचा आहे. माणसाच्या मनात ईमान हवे, ज्याच्या मनात ईमान नाही तो माणूस आंधळा आहे. माफी मागणाऱ्याला अल्लाह सुध्दा माफ करतो, त्यामुळे माणसाने माफीचे धोरणा अवलंबवावे. नल्लामंदू सर म्हणतात, 'जो माणूस अल्लाहचे ध्यान करतो, त्याचे हृदय प्रकाशमान होते' (पान नंबर ४६) माणूस खोट्या दुनियेत आपले मन रमवत असतो. खरे जग हे मृत्यूनंतरचे आहे आणि कबर हा दुसऱ्या जगात जाण्याचा दरवाजा आहे.

कोणत्याही परिस्थितीत संकटात असलेल्या प्रत्येक व्यक्तीला मदत करा, मदत केल्यानंतर त्याची नोंद अल्लाच्या दरबारी तुमच्या नावावर होते. नल्लामंदू सर म्हणतात, 'एखाद्या माणसाची मदत करा. समजा तो माणूस गद्दारी केला तरी चालेल मात्र अल्लाहच्या दरबारात त्याची नोंद होते. अल्लाहच्या दरबारात नेकी बरबाद होत नाही' (पान नंबर ५२) दारावर अनेक लोक मदतीच्या अपेक्षेने येतात, अनेकदा अशा लोकांना हाकलून दिले जाते, पण हे अयोग्य आहे. नल्लामंदू सर म्हणतात, 'सहसा आपल्या घराच्या दारात कोणी भीक मागणारा आला तर त्याला आपण हाकलून देतो, त्याला भीक दिली तर आपले कमी होईल, असा विचार डोक्यात आणणे म्हणजे गुन्हा आहे. अन्नात, खाण्या-पिण्यात बरकत देण्याचे कार्य अल्लाहचे आहे' (पान नंबर ५४) अल्लाकडे इज्जत वाढवण्यासाठी माणसाकडून सद्वर्तनाची अपेक्षा नल्लामंदू सर व्यक्त करतात.

अ. लतीफ नल्लामंदू यांनी 'कासिद' मधून सामाजिक बांधीलकी पत्करुन अनेक सामाजिक आशय विषय हाताळले आहेत. देशातील शैक्षणिक स्थिती गतीवर ते भाष्य करतात. समाजाचे मानसिक स्वास्थ्य नीट टिकवून ठेवण्यासाठी न्याय बाजू मजबूत व खंबीर हवी. इस्लाममध्ये राजा आणि रंक दोघे एकाच रांगेत उभे राहून नमाज पठण करतात. कारण मुसलमानामध्ये सर्वांना समान दर्जा आहे. तेव्हा न्याय सुध्दा सर्वांना समान मिळावा. पण आज पैशाशिवाय न्याय नाही अशी परिस्थिती निर्माण झाल्याचे नल्लामंदू म्हणतात. कासिदमधून नल्लामंदू सरांनी धर्मनिरपेक्षतेचा संदेश नेहमीच दिला आहे. रमजान ईद, बकरी ईद विशेषांक ते काढतात. तसेच त्यांनी दिवाळी, १५ ऑगस्ट, २६ जानेवारी, मौलाना आझाद, पंडित नेहरु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, मा. ना. सुशीलकुमार शिंदे, मा. ना. विलासराव देशमुख इत्यादींवर विशेषांक त्यांनी प्रकाशित केले आहेत.

अ. लतीफ नल्लामंदू यांनी 'कासिद' च्या अग्रलेखातून विविध विषयवर चिंतनपर मार्गदर्शन केले आहे. आज राजकरणात नगरसेवकापासून ते मंत्र्यापर्यंत प्रत्येकला आपल्या मागे मोठा लवाजमा बरोबर घेऊन जाण्याची, मिरवण्याची सवय लागली आहे. पण सार्वजनिक जीवनात वावरणाऱ्या व्यक्तीनी साधी राहणी आणि उच्च विचारश्रेणी बाळगणे नल्लामंदू सरांना महत्त्वाचे वाटते. स्वातंत्र्य मिळून ६८ वर्षे झाली, आपण लोकसंख्या वाढ आणि भ्रष्टाचार या शिवाय इतर कोणत्याच गोष्टीत ठळक अशी प्रगती करू शकलो नाही. राज्यकर्ते देशाला लुटत आहेत, आज देश कोणत्या दिशेने जातो आहे, याबद्दल नल्लामंदू चिंतीत आहेत. देशात धर्मावरून, जातीवरून, मशीद-मंदिरवरून, भाषेवरून वाद निर्माण केले जात आहेत. राजकारणी लोक नको त्या गोष्टींना खतपाणी घालून आपली राजकीय पोळी भाजून घेत आहेत. नल्लामंदू सर सर्वच राजकारण्यांना, नेत्यांना दोष देत नाही तर ज्यांनी समाजासाठी खरोखर योगदान दिले आहे. त्यांच्या कार्यकर्तृत्त्वाचा खुल्या मनाने कौतुक करतात. नल्लामंदू सरांच्या मनात डॉ. बाबासाहेब आंबेडकरबद्दल रास्त अभिमान आहे ते डॉ. बाबासाहेब आंबेडकरबद्दल गौरव उदगार काढताना म्हणतात, 'बाबासाहेबांच्या लेखणीची ताकद म्हणजे भारताची राज्यघटना आहे. भारतीय राज्यघटना म्हणजे बहुजनांचे ताजमहल आहे' (पान नंबर २७) बाबासाहेबांचे कार्य किती मोठे आहे, हे नल्लामंदू सरांच्या वरील दोन वाक्यातून वाचकांच्या सहज लक्षात येते.

१९८० नंतर मुस्लीम समाजातील तरुण शिकून पुढे येत होते. अशा स्थितीत या तरुणांना जे सामाजिक भान येत होते ते हे तरुण साहित्याच्या माध्यमातून मांडत होते. अशा या तरुणांना हक्काचे व्यासपीठ लाभावे म्हणून नल्लामंदू सरांनी काही साहित्यिकांच्या सहकार्याने १९९० साली सोलापूरात अखिल भारतीय मुस्लीम मराठी साहित्य संमेलन घेतले. साहित्य सेवेचे कार्य पुढे नेण्यासाठी मुस्लीम मराठी साहित्य परिषदेची स्थापना केली गेली. या परिषदेच्या स्थापनेत नल्लामंदू सरांचे महत्त्वाचे योगदान आहे. या परिषदेतर्फे त्यांनी सतत साहित्य संमेलने घेतली, या परिषदेच्या खजिनदार पदाची जबाबदारी त्यांनी चोखपणे पार पाडली. पण काही व्यक्तींच्या दडपशाहीमुळे पुढे या परिषदेत गट-तट निर्माण झाले आणि ज्यांनी महत्त्वाचे योगदान दिले त्यांनाच बाजूला करून साहित्य परिषदेची वेगळी चूल मांडली गेली. ज्या तळमळीने, ज्या कार्यासाठी नल्लामंदू सरांनी साहित्य परिषदेची स्थापना केली होती ते कार्य काही जणांच्या दडपशाही वृत्तीमुळे थंडावले, याचे अतोनात दुःख नल्लामंदू सरांना आहे.

अ. लतीफ नल्लामंदू सरांना ज्या-ज्या व्यक्ती भावल्या, ज्या-ज्या व्यक्तींनी आपल्या कार्यकर्तृत्त्वाने वेगळा ठसा उमटवला त्या त्या व्यक्तींच्या कार्यकर्तृत्त्वाचा गौरव हातचे काही राखून न ठेवता मुक्तकंठाने आपल्या विविध ग्रंथांच्या माध्यमातून नल्लामंदू

सरांनी केलेले आहे.

(१) त्यागमूर्तीः सोनिया गांधी - या ग्रंथात त्यांनी सोनिया गांधींच्या जन्मापासून ते चौदाव्या लोकसभेच्या वेळी सोनिया गांधींनी पंतप्रधान पद नाकारून मनमोहन सिंग यांना पंतप्रधान करेपर्यंतचे विचार मांडलेले आहेत. या पुस्तकात सोनिया गांधींच्या व्यक्तिमत्त्वाचा शोध घेत घेत सोनियाच्या विदेशीचा मुद्दा उठविणाऱ्या बुध्दीवंतांना नल्लामंदू सर वैचारिक धडा शिकवितात.

(२) मुस्लीम स्वातंत्र्य सेनानी : धगधगते यज्ञकुंड : या ग्रंथात भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यात जितके योगदान अन्य धर्मियांचे आहे तितकेच मुस्लीमांचेही आहे ते सप्रमाण सिध्द करतात. देशाच्या स्वातंत्र्यासाठी मुस्लीम तरुणांनीच नाही तर मुस्लीम स्त्रियांनी देखील मोठे योगदान दिले आहे. या योगदानाचा इतिहासच ते येथे सप्रमाण मांडतात. तीन हजार मुस्लीम स्वातंत्र्य सैनिकांनी काळ्या पाण्याची शिक्षा भोगली पण त्याचा साधा उल्लेखही कोठे होत नाही. देशातील मुस्लीमांनी इंग्रज सरकारच्या विरोधात अनेक वृत्तपत्रे काढून जनजागरण केले. असंख्य मुस्लीम तरुण फासावर गेले - अनेकांनी लाठ्या, गोळ्या खाल्या. पण त्याचे कुठेच नामोनिशाण नाही. स्वदेशीच्या नावावर मुस्लीमांचे व्यवसाय बंद केले, त्यांना दारिद्र्या आले, देश प्रेमाखातर मुस्लीम दारिद्र्यात जीवन जगत राहिले, गद्दार मात्र गब्बर झाले. या प्रकारचे संशोधनात्मक प्रखर विचार नल्लामंदू सरांनी या ग्रंथात नोंदवून मुस्लीम स्वातंत्र्य सेनानींच्या राष्ट्रप्रेमाची एक दूर्लक्षित बाजू देशासमोर आणली आहे.

(३) रोशन सितारे : या ग्रंथात सामाजिक कार्यात आपला वसा निर्माण करणाऱ्या मा. ना. सुशीलकुमार शिंदे पासून हाजी कासमभाई तांबोळी पर्यंतच्या विविध मान्यवरांच्या कार्याचा गौरव केला आहे.

(४) सुशीलकुमार शिंदे तारिखसाज शखसियत : या ग्रंथात नल्लामंदू सरांनी मा. ना. सुशीलकुमार शिंदे यांच्या जीवन चरित्राचा शोध घेतला आहे. सुशीलकुमार शिंदे यांचे सारे जीवन कसे प्रकाशनमान होत गेले. हे चित्रित करतानाच श्री. शिंदे यांच्या जीवनातील कडू-गोड आठवणींना ते उजाळा देतात.

(५) रोशन सितारे - भाग दोन : या पुस्तकात त्यांनी हजरत सय्यद सुलेमान पासून ॲड. शाह गोजियोद्दीन पर्यंतच्या विविध महनीय व्यक्तींच्या कार्याची ओळख करून दिली आहे.

अ. लतीफ नल्लामंदू यांच्या या ग्रंथ लेखनामागील उद्देश जर पाहिला तर तो असा दिसतो की मुस्लीम आणि मुस्लिमेतर समाजातील कर्तृत्वान मंडळींची ओळख पुढील पिढीस व्हावी या कार्यशील व्यक्तींचे कर्तृत्व काळाच्या ओघात विसरले जाऊ नये आणि या लेखनाच्या माध्यमातून या व्यक्तीच्या कार्यकर्तृत्वाचा गौरव व्हावा हा होय. अ. लतीफ नल्लामंदू यांची सारीच पुस्तके अभ्यासपूर्ण असून भावी पिढीला एक ऐतिहासिक दस्तावेज म्हणून त्याचा नक्कीच उपयोग होईल यात तिळमात्र शंका नाही.

अ. लतीफ नल्लामंदू यांनी 'कासिद' च्या माध्यमातून आपली घोडदौड सुरू केली. १९७५ च्या काळात रंगा अण्णा वैद्य यांच्या आग्रहामुळे नल्लामंदू सरांनी सोलापूर जिल्हा मराठी पत्रकार संघात प्रवेश केला. १९८० साली ते कार्यकारणीत आले, १९२० ते २०१० पर्यंत ते संघाच्या सचिव पदी राहिले तर २०११ पासून आज अखेर ते पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष आहेत. पत्रकार संघात कार्य करताना त्यांनी १९८२ मध्ये बिहार सरकारच्या वृत्तपत्रावरील काळ्या कायद्याला विरोध केला. तेव्हा त्यांना पाच दिवस तुरूंगवास भोगावा लागला. पोलीसांनी पत्रकारांच्या विरोधात दाखल केलेले खोटे गुन्हे परत घ्यावे यासाठी त्यांनी आंदोलन केले. सोलापूर जिल्हा मराठी पत्रकार संघाचे पत्रकार भवन निर्मितीसाठी नल्लामंदू सरांनी विशेष परिश्रम घेतले.

'कासिद' च्या माध्यमातून अध्यात्मिक, सामाजिक, राजकीय, धार्मिक विषयावर विचार मांडून, सामाजिक प्रबोधन करून सामाजिक परिवर्तनाचा विडा उचलणरे 'कासिदकार' अ. लतीफ नल्लामंदू यांच्या कार्याचा धावता आढावा प्रा. डॉ. इ. जा. तांबोळी यांनी १० प्रकरणात १५२ पानांच्या माध्यमातून घेतला आहे, हा धावता आढावा आहे. अ. लतीफ नल्लामंदू यांचे कार्य पाहता त्याचे सूक्ष्म लेखन केले गेले तर त्या पुस्तकाच्या एक-एक प्रकरणासाठी १५२० पाने सुध्दा कमी पडतील यात शंका नाही.

प्रा. डॉ. इ. जा. तांबोळी यांनी अ. लतीफ नल्लामंदू यांच्या कार्याचे 'चिंतन' वाचकांच्या पुढे 'कासिदकार' च्या माध्यमातून ठेवले आहे. चरित्रग्रंथाची भाषाशैली ओघवती, गतीमान आहे. ग्रंथाच्या शेवटी नल्लामंदू यांच्या कार्यकर्तृत्त्वा संदर्भातील वर्तमान पत्रातील बातम्या व फोटो देण्यात आले आहेत. त्यामुळे 'कासिदकार' चे चरित्र अत्यंत ठळकपणे वाचकांच्या नजरेसमोर उभे राहते.

संदर्भ ग्रंथ

१ जोशी अ. म., 'चरित्र - आत्मचरित्र' सुविचार प्रकाशन मंडळ प्रायव्हेट लिमिटेड, नागपूर, १९५६.
२ जोशी अ. म., 'प्रदक्षिणा', "चरित्रवाङ्मय" कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे-३०, पाचवी आवृत्ती, १९७२.
३ कऱ्हाडे सदा, 'चरित्र आणि आत्मचरित्र', लोकवाङ्मय प्रा. लि., मुंबई, प्रथमावृत्ती, १९७६.
४ तांबोळी इ. जा., 'कासिदकार', अक्षरलेणं प्रकाशन, सोलापूर, प्रथमावृत्ती, २०१४.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.org